राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे-३०.

'STARS' प्रकल्पांतर्गत

# संकलित मूल्यमापन २ : २०२४-२५

## इयत्ता - पाचवी : विषय - मराठी (प्रथम भाषा)

## उत्तरसूची

### उत्तरसूची व गुणदानाबाबत सूचना

| तोंडी | लेखी | एकूण गुण |
|---|---|---|
| १० | ४० | ५० |

| तोंडी चाचणी | | | |
|---|---|---|---|
| प्र. क्र. | योग्य उत्तरे व सूचना | अध्ययन निष्पत्ती क्र. | गुणदान |
| प्र. १) | **खालील परिच्छेद लक्षपूर्वक ऐक व विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे सांग.** | 05.01.01 | ५ |
| | शिक्षकांनी दिलेल्या परिच्छेदाचे विद्यार्थ्यांसमोर दोन वेळा प्रकटवाचन करावे. सर्व प्रश्नांचेही वाचन करावे. त्यानंतर पुन्हा एकदा परिच्छेद ऐकवून प्रश्न विचारावेत. | | |
| | अ) जादूच्या होडीतून | | १ |
| | आ) दिलीपला आकाशातून खाली वाकून पाहिल्यावर मोठमोठे डोंगर दिसले, नद्या दिसल्या, समुद्र दिसला, जमीन दिसली. ते सर्व पाहून दिलीपला गंमत वाटत होती. अशा आशयाचे उत्तर दिल्यास २ गुण द्यावेत. यांतील एखादाच मुद्दा सांगितल्यास १ गुण द्यावा. | | २ |
| | इ) दिलीपला दिसणाऱ्या नद्या चांदीच्या तारांप्रमाणे भासत होत्या. | | १ |
| | ई) जादूची होडी, प्रवासाची मौज अशा प्रकारचे समर्पक शीर्षक सांगितल्यास १ गुण द्यावा. | | १ |
| प्र. २) | **खालील सूचनेनुसार कृती कर.** | 05.01.06 | ५ |
| | अ) खालील उताऱ्याचे प्रकटवाचन कर. | | ३ |
| | • उताऱ्याचे स्वराघातासह, विरामचिन्हे लक्षात घेऊन विहित वेळेत अचूक वाचन केल्यास ३ गुण द्यावेत. | | |
| | • उताऱ्याचे स्वराघातासह, मात्र विरामचिन्हे लक्षात न घेता विहित वेळेत वाचन केल्यास २ गुण द्यावेत. | | |
| | • उताऱ्याचे अपूर्ण व अपेक्षित गतीने वाचन न केल्यास १ गुण द्यावा. | | |
| | आ) १) पात्रे - तनया, तिची आई | | १ |
| | २) पुस्तक प्रदर्शनाची जाहिरात | | १ |

| लेखी चाचणी | | | |
|---|---|---|---|
| प्र. क्र. | योग्य उत्तरे व सूचना | अध्ययन निष्पत्ती क्र. | गुणदान |
| प्र. ३) | **खालील सूचनाफलकाचे वाचन करून विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिही.** | 05.01.05 | ६ |
| | अ) सहजीवन सोसायटीतील रहिवाशांसाठी | | १ |
| | आ) पर्याय ४) पाणी विकत आणणे. या पर्यायास गोल केल्यास | | १ |
| | इ) १) १० मार्च, २०२५ | | १ |
| | ई) दोन दिवस | | १ |
| | उ) पाणी वाचविण्यासाठी दोन उपाय लिहिल्यास २ गुण द्यावेत.<br>एक उपाय लिहिल्यास १ गुण द्यावा. | | २ |
| प्र. ४) | **खाली दिलेली माहिती वाच व सूचनेनुसार कृती पूर्ण कर.** | 05.01.08 | ४ |
| | अ) किल्ल्याचे नाव लिहिल्यास १ गुण द्यावा. | | १ |
| | आ) किल्ला बनवण्यासाठी खालीलपैकी साहित्य लिहिल्यास १ गुण द्यावा. उदा. माती, पाणी, विटा, कामटी, गोणपाट, गेरू, चुना, आळीव इत्यादी. (कोणतेही दोन साहित्य लिहिल्यास १ गुण द्यावा. एक साहित्य लिहिल्यास गुण देऊ नये.) | | १ |
| | इ) किल्ला बनवण्याची कृती चार ते पाच वाक्यांत लिहिल्यास २ गुण द्यावेत.<br>दोन ते तीन वाक्यांत लिहिल्यास १ गुण द्यावा. (एक वाक्यास गुण देऊ नये.) | | २ |
| प्र. ५) | **खालील प्रसंग वाच व संवाद लिही.** | 05.01.09 | ४ |
| | १) संवादातील वाक्यांच्या अर्थपूर्ण चार जोड्या लिहिल्यास ४ गुण द्यावेत.<br>२) संवादातील वाक्यांच्या अर्थपूर्ण तीन जोड्या लिहिल्यास ३ गुण द्यावेत.<br>३) संवादातील वाक्यांच्या अर्थपूर्ण दोन जोड्या लिहिल्यास २ गुण द्यावेत.<br>४) संवादातील वाक्यांच्या अर्थपूर्ण एक जोडी लिहिल्यास १ गुण द्यावा.<br>५) एकाच पात्राचे संवाद लिहिल्यास ० गुण द्यावा. | | |
| प्र. ६) | **सूचनेनुसार उत्तरे लिही.** | 05.01.10 | ६ |
| | अ) चौकटीत दिलेल्या अक्षरांपासून प्रत्येक एक शब्द तयार करण्यास १ गुण द्यावा. तयार केलेले शब्द एकवचन आहे की अनेकवचन आहे हे ओळखून योग्य ठिकाणी लिहिल्यास १ गुण द्यावा. | | |
| | १) • टोपली, पाखरू, घर, पाटा, वही व टोप यांपैकी कोणताही एक एकवचनी शब्द अचूक वर्गीकरण करून लिहिल्यास २ गुण द्यावेत. | | २ |
| | २) • खिडक्या, टाळ्या, पाली, घरे यांपैकी कोणताही एक शब्द अचूक वर्गीकरण करून लिहिल्यास २ गुण द्यावेत.<br>(दिलेल्या चौकटीतील शब्द तयार करून मात्र एकवचन - अनेकवचन शब्द असे वर्गीकरण न करता ओळखून एका शब्दास १ गुण द्यावा.<br>• एकवचनी, अनेकवचनी प्रत्येकी एक योग्य शब्द लिहिल्यास २ गुण द्यावेत. | | २ |

| प्र. क्र. | योग्य उत्तरे व सूचना | अध्ययन निष्पत्ती क्र. | गुणदान |
|---|---|---|---|
| | आ) १) वाक्यात 'होती' हे क्रियापद लिहिल्यास १ गुण द्यावा.<br>२) वाक्यात 'होते' हे क्रियापद लिहिल्यास १ गुण द्यावा. | | १<br>१ |
| प्र. ७) | **खालील सूचनेनुसार कृती कर.** | 05.01.11 | २ |
| | अ) आरोही, तू किती सुंदर नृत्य करतेस!<br>• स्वल्पविराम व उद्गारवाचक चिन्ह ही चिन्हे वाक्यात योग्य ठिकाणी दिल्यास २ गुण द्यावेत.<br>• एक योग्य विरामचिन्ह दिल्यास १ गुण द्यावा. | | २ |
| प्र. ८) | **खाली दिलेला शब्द वापरून प्रत्येकी एक अर्थपूर्ण वाक्य तयार करून लिही.** | 05.01.12 | २ |
| | दिलेला प्रत्येक शब्द वापरून एक अर्थपूर्ण वाक्य तयार केल्यास प्रत्येकी एक गुण द्यावा. दोन वाक्यांस दोन गुण द्यावेत. | | |
| प्र. ९) | **खालील चित्राचे निरीक्षण कर व त्याखालील विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिही.** | 05.01.13 | ६ |
| | अ) पतंग उडवणारी मुले अशा आशयाचे कोणतेही समर्पक एक वाक्य लिहिल्यास १ गुण द्यावा.<br>आ) पतंग तयार करण्यासाठी लागणारे साहित्य - रंगीत कागद, दोरा, डिंक, काड्या, कात्री (यांपैकी कोणतेही चार साहित्य लिहिल्यास २ गुण द्यावेत. व कोणतेही दोन साहित्याची नावे लिहिल्यास १ गुण द्यावा. (अर्धा गुण देऊ नये.)<br>इ) मुक्तोत्तरी कृती : शिक्षकांनी समर्पक उत्तराचा स्वीकार करावा.<br>• चित्रातील प्रसंगाबाबत चार ते पाच अर्थपूर्ण वाक्ये लिहिल्यास ३ गुण द्यावेत.<br>• चित्रातील प्रसंगाबाबत दोन ते तीन वाक्ये लिहिल्यास २ गुण द्यावेत.<br>• चित्रातील प्रसंगाबाबत एक वाक्य लिहिल्यास १ गुण द्यावा. | | १<br>२<br>३ |
| प्र.१०) | **खालील कविता वाच व त्याखालील विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिही.** | 05.01.14 | ५ |
| | अ) झाड<br>आ) आजीचा प्रेमळपणा व्यक्त होतो अशा कृती - आजीने खाऊ देणे, गोष्ट सांगणे, अंगाईगीत गाणे, नातवंडांना मायेने कुशीत घेणे.<br>• प्रत्येक कृतीस १ गुण याप्रमाणे चार कृतीस ४ गुण द्यावेत. | | १<br>४ |
| प्र.११) | **खाली दिलेल्या मुद्‌द्यांच्या आधारे ७ ते ८ ओळींत गोष्ट तयार करून लिही व गोष्टीला समर्पक शीर्षक दे.** | 05.01.15 | ५ |
| | सुसंगत, अर्थपूर्ण वाक्यरचना, आकर्षक शीर्षक व शेवट इत्यादी गोष्टी लक्षात घ्याव्यात.<br>• समर्पक शीर्षक लिहिल्यास १ गुण द्यावा.<br>• सहा ते आठ वाक्यांत गोष्ट लिहिल्यास ४ गुण द्यावेत.<br>• चार ते पाच वाक्यांत गोष्ट लिहिल्यास ३ गुण द्यावेत.<br>• तीन वाक्यांत गोष्ट लिहिल्यास २ गुण द्यावेत.<br>• एक किंवा दोन वाक्यांत गोष्ट लिहिल्यास १ गुण द्यावा. | | |

■■■